

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com




• वर्ष : ०३ • अंक : १६४ • पुणे • सोमवार, दि. ०२ मार्च २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313


# भारताची विजयी होळी

## संजू सॅमसनचं शतक अवघ्या ३ धावांनी हुकलं! पण पठ्ठ्यानं किंग कोहलीचा विक्रम मोडून वेधलं जगाचं लक्ष

### टीम इंडियाची सेमीफायनलमध्ये मुसंडी
### संजू सॅमसनची नाबाद ९७ धावांची मॅच विनींग खेळी

**कोलकाता (दै. आरंभ पर्व)**

कोलकाता येथील ऐतिहासिक ईडन गार्डन्सवर रविवारी (दि. 1) क्रिकेटचा असा महासंग्राम रंगला, ज्याने चाहत्यांच्या काळजाचा ठोका चुकावला. टी-२० विश्वचषक २०२६ च्या 'सुपर ८' फेरीतील या अटीतटीच्या लढतीत भारताने वेस्ट इंडिजचा ५ गडी राखून पराभव केला. वेस्ट इंडिजने उभारलेला १९५ धावांचा डोंगर भारताने संजू सॅमसनच्या अविस्मरणीय 'रुद्रावतारा'च्या जोरावर अवघ्या १९.२ षटकांत सर केला. या विजयासह भारताने सेमीफायनलमध्ये धडक मारली. आता पुढील सामना इंग्लंडविरुद्ध मुंबईच्या वानखेडे मैदानावर खेळवला जाणार आहे. नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला उतरलेल्या वेस्ट इंडिजने सुरुवातीपासूनच भारतीय गोलंदाजांवर प्रहार करण्यास सुरुवात केली. शाई होप (३२) आणि रोस्टन चेस (४०) यांनी पाया रचला, तर शिमरॉन हेटमायरने १२ चेंडूत २७ धावांची आतिशबाजी केली. पण खरा धमाका झाला तो अखेरच्या षटकांत! जेसन होल्डर (नाबाद ३७) आणि रोवमन पॉवेल (नाबाद ३४) यांनी भारतीय गोलंदाजांची दाणादाण उडवत ७६ धावांची अभेद्य युती केली आणि विंडीजला १९५ या विशाल धावसंख्येपर्यंत पोहोचवले. भारताकडून जसप्रीत बुमराहने २ बळी घेतले, मात्र धावगती रोखण्यात तोही अपयशी ठरला.

भारताचा प्रतिहल्ला: संजू सॅमसनची 'मॅच विनिंग' खेळी १९६ धावांचे महाप्रचंड लक्ष्य समोर असताना भारताची सुरुवात अडखळत झाली. अभिषेक शर्मा आणि इशान किशन स्वस्तात बाद झाले, तर कर्णधार सूर्यकुमार यादवही १८ धावांवर माघारी परतला. ईडन गार्डन्सवर काही काळ स्मशानशांतता पसरली होती. पण आज नशिबाच्या रेषा आणि बॅटची ताकद वेगळ्याच मुडमध्ये होती. यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसन आज एखाद्या चिवट योद्ध्यासारखा मैदानावर पाय रोवून उभा होता. त्याने आपल्या बॅटमधून चौकार-षटकारांची अशी काही बरसात केली की कॅरिबियन गोलंदाज हतबल झाले. संजूने अवघ्या ५० चेंडूत १२ चौकार आणि ४ उत्तुंग षटकारांसह नाबाद ९७ धावांची अजरामर खेळी साकारली. शतकाने त्याला अवघ्या ३ धावांनी हुलकावणी दिली असली, तरी त्याने भारतीय चाहत्यांची मने जिंकली. त्याला तिलक वर्मा (२७) आणि हार्दिक पंड्या (१७) यांनी मोलाची साथ दिली. शेवटच्या षटकांत रोमांच शिगेला पोहोचला होता, पण संजू सॅमसनच्या साथीला आलेल्या शिवम दुबेने २ चेंडूत ८ धावा कुटून विजयाची औपचारिकता पूर्ण केली. भारताने १९.२ षटकांत ५ बाद १९९ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

### आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यातील उल्लेखनीय खेळी

| खेळाडू | धावा | चेंडू | चौकार | षटकार | स्ट्राईक रेट | प्रतिस्पर्धी | मैदान | तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सूर्यकुमार यादव | ११७* | ५० | १२ | ५ | २३४ | वेस्ट इंडीज | ईडन गार्डन्स | ८ मार्च २०२६ |
| विराट कोहली | ८२* | ५२ | ९ | २ | १५६.०८ | ऑस्ट्रेलिया | मोहाली | २७ मार्च २०१६ |
| विराट कोहली | ८२* | ५३ | ६ | ४ | १५४.७१ | पाकिस्तान | मेलबर्न | २३ ऑक्टोबर २०२२ |
| रोहित शर्मा | ७९* | ४६ | ४ | ६ | १७१.७३ | ऑस्ट्रेलिया | ब्रिजटाउन | ७ मे २०१० |
| विराट कोहली | ८२* | ६९ | ८ | २ | १२७.६८ | पाकिस्तान | कोलंबो (आरपीएस) | ३० सप्टेंबर २०१२ |

**५ मार्च रोजी, भारत आणि इंग्लंड यांच्यामध्ये मुंबईतील वानखेडे स्टेडिअमवर दुसरा उपांत्य सामना होईल. उपांत्य फेरीतील विजेता संघ रविवारी, ८ मार्च रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडिअमवर विश्वचषकाच्या विजेतेपदासाठी लढणार आहेत.**



दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**आज सोमवार, दि. ०२ मार्च २०२६ रोजी होळी निमित्त 'दै. आरंभ पर्व' कार्यालयाला सुट्टी असल्याने मंगळवार, दि. ०३ मार्च २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.**

**- संपादिका**

## ठळक बातम्या

### पुणे जिल्हा, कायद्याचा बालेकिल्ला!

**पुणे (आरंभ पर्व) : पुणे पोलिसांनी सराईत गुन्हेगारांना मोठा दणका दिला आहे. 'दादा' समजत दहशत माजवणाऱ्या रेकॉर्डवरील गुंडांना पोलिसी खाक्या दाखवण्यात आलाय. रेकॉर्डवरील गुन्हेगारांना पुणे पोलिसांनी थेट तडीपार केलंय. शहरातील 9 गुंडांना पुणे शहर आणि जिल्ह्यातून तडीपार केलंय. शहरातील बिबवेवाडी, आंबेगाव, मार्केटयार्ड आणि शहरातील इतर परिसरात गुंड दहशत माजवत होते. या 9 गुंडाना दोन वर्षांसाठी तडीपार केलंय. पुणे पोलिसांनी केलेल्या कारवाईची सर्वत्र चर्चा होत आहे. पुणे पोलिसांनी गुन्हेगारांचा बिमोड करण्यासाठी कडक पावले उचलायला सुरुवात केलीये. या रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर गुन्हेगारी टोळींच्या दहशतीमुळे पुणेकर भयभीत झालेत. या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाल्याने नऊ जणांना तडीपार करण्यात आल्याचं समोर आलंय.**

## आखातातील युद्धामुळे पोलीस दक्ष

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस दक्ष झाले आहेत. शहरातील संवेदनशील ठिकाणांवर पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात आले आहे. या भागात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहरातील धार्मिक स्थळे, गर्दीच्या ठिकाणी बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. 'पुणे शहरात आखाती देशातील विशेषत: इराणमधील विद्यार्थी वास्तव्यास आहेत. पुणे पोलिसांच्या विशेष शाखेतील अधिकारी, तसेच कर्मचाऱ्यांकडून इराणमधील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला आहे. इराणी विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या संस्था चालकांच्या संपर्कात पोलीस आहेत', अशी माहिती विशेष




शाखेतील अधिकाऱ्यांनी दिली. 'संशयास्पद व्यक्ती किंवा वस्तू आढळून आल्यास त्वरित पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षात (क्रमांक-११२) किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा', असे आवाहन करण्यात आले आहे. व्हिसाची मुदत संपत असल्यास इराणी विद्यार्थ्यांनी संपर्क साधल्यास ती वाढवून देण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न केले जाणार आहेत.

## इमारतीतून उडी मारुन तरुणीची आत्महत्या

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वाघोलीतील एका बहुमजली इमारतीच्या आठव्या मजल्यावरुन उडी मारुन एका तरुणीने आत्महत्या केल्याची घटना घडली. तरुणीच्या आत्महत्यामागचे निश्चित कारण समजू शकले नाही . सारा अंधारे (वय २०, रा. मॅजेस्टिक ओएसिस सोसायटी, वाघोली, नगर रस्ता) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंधारे कुटुंब मूळचे सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील आहे. सारा ही आई आणि बहिणीसोबत राहत होती.

## पुण्यातील दहा नागरिकांसह ८० विद्यार्थी दुबईत अडकले



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अमेरिका आणि इस्त्रालयने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर इराणने प्रत्युत्तरा दाखल अमेरिकेच्या दुबई येथील हवाई तळावरील केलेल्या हल्ल्यामुळे पुण्यातील दहा नागरिक आणि ८० विद्यार्थ्यांसह पाच शिक्षक दुबईत अडकले आहेत. या सर्वांशी जिल्हा प्रशासनाचा संपर्क झाला असून सर्वजण सुखरूप असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. सुहानी चेतन देविदास, सिद्धेश्वर धनराज जाधव, रोहित हरी अल्हाट,संदीप अशोक उकरंडे, गणेश सूर्यकांत गुळवे, अजय चंद्रशेखर काळे, प्रवीण मच्छिंद्र बंड, विशाल भरत भोसले आणि किशोर कुलकर्णी हे पुण्यातील नागरिक दुबईत अडकले आहेत. या सर्वांबरोबर जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने संपर्क साधला असून ते सर्वजण सुरक्षित असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. दरम्यान, पिंपरी-चिंचवड येथील इंदिरा महाविद्यालयाचे ऐंशी विद्यार्थी आणि पाच शिक्षकही दुबईत अडकले आहेत. हे विद्यार्थी आणि शिक्षक पंधरा दिवसांच्या कॉलेज कॅम्पेन साठी गेले होते, असे जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

# दादांच्या अपघाती निधनाला महिना पूर्ण

### ३० दिवसात बदललं राज्याचं राजकारण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बरोबर, गेल्या ३० दिवसांपुर्वी महाराष्ट्राच्या काळजाचा ठोका चुकला, पहाटे अजित पवारांचं विमान बारामतीत कोसळलं आणि वेळ पाळणारे अजित दादा वेळेआधीच महाराष्ट्राला पोरकं करुन गेले. अजित दादांच्या अपघाती मृत्यूची बातमी येताच अवघा महाराष्ट्र हादरला. आजवर विमान अपघातात देशानं अनेक उमदे नेते गमावले पण अजितदादा सारखा कामाचा माणूस अशा पद्धतीनं गेल्यानंतर या अपघातावर संशय व्यक्त झाला. दादांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होण्याआधीच पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बँनर्जींनी हा घातपात असल्याचा आरोप करुन या अपघातावर सवाल उपस्थित केला. मात्र जनक्षोभ उसळू नये म्हणून पवारांनी तातडीनं माध्यमांसमोर येत घातपाताचा दावा फेटाळून लावला. दुसरीकडे दादांच्या मृत्यूनंतर राष्ट्रवादीची विलिनीकरणाची चर्चा रंगली. मात्र दाव्या प्रतिदाव्यांमुळे ही चर्चाही बारगळली. याच दरम्यान दादांच्या अंत्यसंस्कारानंतर आधी अमोल मिटकरी आणि अजितदादांच्या दहाव्यानंतर रोहित पवारांनी दादांचा अपघात नाही घातपात असल्याचा संशय व्यक्त केला. आणि महिनाभरात हा संशय आणखीच बळावत गेलाय. एका बाजूला मिटकरी आणि रोहित पवारांच्या दाव्यामुळे संशयाचं धुकं गडद होत असतानाच अजित पवारांचा धाकटा मुलगा जय पवार आणि सुनेत्रा पवार यांनी देखिल या अपघाताच्या चौकशी मागणी केली. तर. अजित पवारांच्या निधनाच्या निधनांतर राष्ट्रवादीसोबत राज्यातील राजकीय घडामोडी वेगानं घडल्या. तिसऱ्या दिवशी अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवारांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून



शपथ घेत राज्यातील राजकारणात थेट प्रवेश केला. यानंतर अर्थ खातं सोडून अजित पवारांकडील सर्व खात्यांची जबाबदारी सुनेत्रा पवारांवर मुख्यमंत्र्यांनी सोपवली. ज्याझेडपी निवडणुकीच्या प्रचारासाठी जातांना दादांचा अपघात झाला त्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादीला मोठं यश मिळालं. तर अजित दादांच्या निधनांनंतर सुरु झालेल्या दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणांची चर्चा पुन्हा बासनात गुंडाळली गेली. तर नुकत्याच झालेल्या राष्ट्रवादीच्या अधिवेशनात सुनेत्रा पवारांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी एकमतानं बसवण्यात आलं तर अजित पवारांचे जेष्ठ सुपुत्र पार्थ पवारांना राज्यसभेची उमेदवारी जाहिर करण्यात आली. याच दरम्यान डीजीसीएनं व्हीएसआर कंपनीवर कारवाईचा बडगा उगारला. त्यामुळे आता एक प्रकारे डीजीसीएनं व्हीएसआर कंपनीला जबाबदार धरल्यानंतरही पोलीस मात्र कंपनीवर गुन्हा दाखल करत नाहीत.. त्यामुळे संशय आणखीच वाढत चाललाय. आता दादांच्या मृत्यूला महिना पूर्ण झाल्यानंतर आलेल्या प्राथमिक अहवालानंतर ही अनेक सवाल अजूनही अनुत्तरित्तच आहेत.



## बहिणीला आधार दिल्याच्या रागातून दाजीकडून मेहुणीवर हल्ला

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

बहिणीला आणि तिच्या मुलाला आधार का दिला, या कारणावरून बहिणीच्या पतीने महिलेवर लोखंडी रॉडने हल्ला करून पायाचे हाड फॅक्चर केले, तसेच तिचा मोबाइल व गळ्यातील सोन्याचे मणी मंगळसूत्रही चोरून नेले. ही घटना शुक्रवारी (दि. २७ फेब्रुवारी) सकाळी पावणेआठच्या सुमारास देहू-आळंदी रस्त्यावरील मोशी येथे घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी महिलेने शुक्रवारी (दि. २७ फेब्रुवारी) याबाबत एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. समाधान रामराव सोनूने (वय ३५, रा.पिंपळनेर, ता.लोणार, जि.बुलढाणा) यांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी महिलेने आपली बहीण व तिचा मुलगा यांना आपल्या घरी राहण्यास आश्रय दिला. या कारणावरून चिडलेल्या समाधान याने महिलेला लोखंडी रॉडने दोन्ही पायांवर मारहाण केली, तसेच महिलेच्या हातातील मोबाइल व गळ्यातील दोन ग्रॅमचे मणी मंगळसूत्र हिसकावून चोरून नेले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### आदिवासी कातकरी समाजातील चिमुकली शिक्षणापासून वंचित



सिंहगड (आरंभ पर्व) : शिक्षणाचा हक्क सर्वांसाठी समान असला तरी प्रत्यक्षात कागदपत्रांच्या अडचणीमुळे आदिवासी कातकरी समाजातील एका चिमुकलीला शाळेच्या दारातच थांबावे लागत असल्याची धक्कादायक बाब खडकवासला परिसरात समोर आली आहे. आईची प्रचंड धडपड असूनही जन्म दाखल्याअभावी या मुलीला शाळेत प्रवेश मिळू शकलेला नाही. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कुटुंब हे आदिवासी कातकरी समाजातील असून मजुरी करून उदरनिर्वाह करते. स्थलांतरित जीवनशैली, आर्थिक अडचणी आणि प्रशासकीय प्रक्रियेची अपुरी माहिती यामुळे मुलीचा जन्म नोंदणी वेळेत होऊ शकली नाही. आता शाळेत प्रवेश घेण्यासाठी जन्म दाखला आवश्यक असल्याने प्रवेश प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले आहेत. चिमुकलीची आई विविध शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवत असून, “मुलगी शिकली पाहिजे” या एकाच ध्यासाने ती धडपड करत आहे. मात्र कागदपत्रांची पूर्तता, साक्षीदारांची मागणी आणि विलंबित नोंदणी प्रक्रियेतील गुंतागुंत यामुळे तिला वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी याकडे प्रशासनाचे लक्ष वेधले असून, अशा वंचित घटकांसाठी विशेष मोहीम राबवून तातडीने जन्मनोंदणी व शाळा प्रवेशाची सोय करावी, अशी मागणी केली आहे. शिक्षणाचा मूलभूत हक्क कागदपत्रांच्या अडथळ्यांमुळे हिरावला जाऊ नये, अशी संतप्त भावना नागरिकांनी व्यक्त केली. दरम्यान, संबंधित विभागाने याची दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी व या चिमुकलीसह इतर वंचित मुलांनाही शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.




### पुणे ग्रामीण दलात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

पुणे (आरंभ पर्व) : पुणे ग्रामीण मुख्यालय, चव्हाणनगर (पाषाण रोड) येथे जागतिक मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस अधीक्षक श्री. संदीपसिंह गिल्ल होते. या विशेष कार्यक्रमासाठी डॉ. स्नेहल तावरे (संचालक, स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्यूट व स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे), डॉ. प्रकाश पंधारे (निवृत्त प्राचार्य), मराठी लेखक व पत्रकार श्री. सु. ल. खुटवड, श्री. अविनाश व हळवे तसेच श्री. मिलिंद शिंत्रे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी अपर पोलीस अधीक्षक श्री. रविंद्र चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजेंद्र मायने तसेच पुणे ग्रामीण दलातील अधिकारी, अंमलदार व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संत साहित्याचे प्रणेते संत ज्ञानेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन आणि ‘ज्ञानेश्वरी’ ग्रंथाचे वाचन करून दीपप्रज्वलनाने करण्यात आली.



### वास्तूरचनाकारांनी शहरी पुनर्विकासाचा पुनर्विचार करावा : कुणाल टिळक

पुणे (आरंभ पर्व) : जुन्या-नव्या इमारती, काही वारसास्थळे, वाडे आणि अन्य प्रांतांतून स्वतंत्र वस्ती करून राहणारे समाजगट, अशी सरमिसळ हे आजच्या शहरांचे वास्तव आहे. या पार्श्वभूमीवर शहराचा विकास आणि गृहनिर्माण, यांचा पुनर्विचार वास्तूआरेखकांनी करावा, असे प्रतिपादन नगरसेवक कुणाल टिळक यांनी केले.

# मुक्ताईनगरच्या पाणीपुरवठा प्रश्नाला मिळणार गती

## आ. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते नव्या पाण्याच्या टाकीचे भूमिपूजन

- अमृत २.० योजनेअंतर्गत तहसील कार्यालय परिसराचा पाणीप्रश्न सुटणार
- लोकप्रतिनिधी व नागरिकांची मोठी उपस्थिती




**मुक्ताईनगर-सागर नानोटे (दै. आरंभ पर्व)**

मुक्ताईनगर शहराच्या वाढत्या विस्ताराचा आणि पाणीटंचाईचा विचार करून राज्य शासनाच्या अमृत २.० योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ करण्यात आला. शहराच्या तहसील कार्यालय परिसरासाठी अत्यंत गरजेच्या असलेल्या 'उर्ध्वस्तंभ जलाशयाचे' (उंच पाण्याची टाकी) भूमिपूजन आमदार चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते दि. १ मार्च २०२६ रोजी रविवारी मोठ्या उत्साहात पार पडले.

मुक्ताईनगर पंचायत समिती समोरील टेकडीवर हा सोहळा संपन्न झाला. या नव्या प्रकल्पामुळे परिसरातील नागरिकांना येत्या काळात नियमित आणि दाबाने पाणीपुरवठा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यावेळी माफदा अध्यक्ष विनोद तराळ, शिवसेना जिल्हा संघटक सुनील पाटील, तालुका प्रमुख नवणीत पाटील, उपनगराध्यक्षा देवयानी शिरसाट, पाणीपुरवठा सभापती सविता भलभले, नगरसेवक संतोष कोळी, मस्तान कुरेशी, हासम शहा, प्रशांत टोंगे, नितीन जैन, लुकमान शेख, मुशीर मणियार, युनूस खान, मुकेशचंद्र वानखेडे, मजीद खान, बोदवड नगराध्यक्ष दिनेश माळी नगरसेवक हर्षल बडगुजर यांच्यासह वसंत भलभले, गणेश पाटील, योजनेचे ठेकेदार मोरे, यांच्यासह शिवसेना-युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

अमृत २.० योजनेद्वारे शहराच्या मूलभूत सोयीसुविधांवर भर दिला जात असून, पाणीपुरवठ्यासारखा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार चंद्रकांत पाटील यांनी विशेष पाठपुरावा केला होता. टेकडीवर होणाऱ्या या टाकीमुळे गुरुत्वाकर्षण शक्तीचा वापर करून (Gravity Feed) सखल भागातील घरांनाही मुबलक पाणी मिळणे शक्य होणार आहे. "शहराच्या शाश्वत विकासासाठी पाणी ही प्राथमिक गरज आहे. अमृत योजनेच्या माध्यमातून आपण प्रत्येक घरापर्यंत शुद्ध पाणी पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे." - आमदार चंद्रकांत पाटील

## अग्रवाल मारवाडी वाणिज्य, उद्योग व शिक्षण मंडळाची ठाम भूमिका

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



अग्रवाल मारवाडी वाणिज्य, उद्योग व शिक्षण मंडळाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या आगामी अर्थसंकल्पाबाबत ठोस, परिणामकारक व वेळबद्ध सुधारणांची जोरदार मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र हा देशाचा आर्थिक व औद्योगिक कणा असल्यामुळे केवळ घोषणांवर न थांबता ठोस धोरणात्मक निर्णय घेणे अत्यावश्यक असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, “महाराष्ट्राला टप्प्याटप्प्याने नव्हे तर वेगवान आर्थिक गतीची गरज आहे. उद्योग व गुंतवणूकदारांना ठोस निर्णयांची अपेक्षा आहे.” राष्ट्रीय अध्यक्ष राजेश अग्रवाल यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, “महाराष्ट्राने आघाडी घ्यावी; पाठलाग करू नये. आगामी अर्थसंकल्पात मुद्रांक शुल्क दोन टक्के करणे, चोवीस तास परवडणारी वीज हमी देणे, एकखिडकी मंजुरी व्यवस्था कठोरपणे राबविणे आणि लघु, सूक्ष्म व मध्यम उद्योगांना ठोस आर्थिक पाठबळ देणे अत्यावश्यक आहे. अर्धवट उपाय महाराष्ट्राच्या आर्थिक नेतृत्वाला टिकवू शकत नाहीत.”

मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमताने नमूद केले की, महाराष्ट्राच्या आर्थिक गतीला बळकटी देण्यासाठी धाडसी आर्थिक सुधारणा, गुंतवणूकदार अनुकूल प्रशासन आणि मोजता येणारी अंमलबजावणी आवश्यक आहे.

# सिंहगड जंगलातील वनव्यावर अखेर नियंत्रण

- सुरक्षा कर्मचाऱ्यांची जीवाची बाजी

**सिंहगड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**



सिंहगड किल्ला परिसर हा दाट जंगलाने वेढलेला असून पावसाळ्यात हिरवागार, निसर्गरम्य रूपात पर्यटकांना मोहवतो. मात्र उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे सध्या परिस्थिती चिंताजनक बनली आहे. वाढत्या तापमानामुळे जंगलात साचलेले गवत व पालापाचोळा यामुळे वनव्याचा धोका वाढला आहे.

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारच्या सुमारास सांबरे वाडी व थोपटे वाडी परिसरात अचानक आग लागली. वाऱ्याचा वेग अधिक असल्याने आगीने काही क्षणांत रौद्ररूप धारण केले आणि मोठ्या प्रमाणावर जंगल जळून खाक झाले. आग विझविण्यासाठी वनविभाग व वनसंरक्षण समितीचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. घेरा सिंहगडचे कर्मचारी गणेश सांबरे, शिवाजी लांघे, शंकर सांबरे, अनिल जोरकर, संदीप सांबरे, शंकर डोंगरे, रमेश खामकर आदींनी जीवाची पर्वा न करता आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. भर दुपारचा कडाका वाऱ्याचा वेग यामुळे सुरुवातीला प्रयत्न अपुरे पडले; मात्र संध्याकाळपर्यंत आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. दरम्यान, त्याच दिवशी सायंकाळी चारच्या सुमारास सिंहगड घाट रस्त्यावरही आग लावण्यात आल्याची घटना समोर आली. या ठिकाणी तातडीने कारवाई करत सुमारे एका तासात आग आटोक्यात आणण्यात आली. विशेष म्हणजे एकाच दिवशी चार ते पाच ठिकाणी आग लागल्याने काही समाजकंटकांकडून जाणूनबुजून आग लावण्यात आल्याची शक्यता व्यक्त होत आहे. एकीकडे वनविभागाचे कर्मचारी वनसंपदा वाचवण्यासाठी जीवाचे रान करत असताना, दुसरीकडे अशा प्रकारच्या कृत्यांमुळे मोठे नुकसान होत असल्याचे चित्र आहे.

रात्री उशिरापर्यंत वनरक्षक बळीराम वायकर, संदीप कोळी, शांताराम लांघे, नितीन गोळे, उत्तम खामकर, निलेश पायगुडे, धनराज सांबरे, निलेश सांगळे व विंकी दुधाने यांनी शर्थीचे प्रयत्न करत वनवा पूर्णतः विझवला. वनरक्षक बळीराम वायकर म्हणाले, “उन्हाळ्यात जंगलात साचलेल्या गवतामुळे आग झपाट्याने पसरते. नागरिकांनी जंगल परिसरात काचाच्या बाटल्या, ज्वलनशील वस्तू टाकू नयेत तसेच जाणूनबुजून आग लावणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल. वनसंपदा ही सर्वांची संपत्ती आहे, तिचे संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.”

# जनसेवा फाऊंडेशनचे ग्रामीण भागासाठी मोलाचे कार्य

- कॉम्रेड गोविंदराव धापरे ग्रामीण रुग्णालयात महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सेवा सुरू

**पानशेत (दै. आरंभ पर्व)**



पानशेत (ता. वेल्हे) – दुर्गम भागातील गोरगरिबांना परवडणारी व दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी या उद्देशाने जनसेवा फाऊंडेशन, पुणे गेली तब्बल ४० वर्षे कार्यरत आहे. अनाथ मुले आणि वृद्धांची सेवा करत असतानाच ग्रामीण भागातील सुमारे ५० गावांमध्ये घरोघरी जाऊन औषधोपचार देण्याचे मोलाचे कार्य ही संस्था करत आहे.


कॉम्रेड गोविंदराव धापरे ग्रामीण रुग्णालय येथे आतापर्यंत ५० हजारांहून अधिक डोळ्यांच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या असून कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, प्रसूती सेवा तसेच विविध आरोग्य उपक्रम राबवले जात आहेत.

पुणे शहरापासून अंतर जास्त असल्याने ग्रामीण भागातील रुग्णांची गैरसोय लक्षात घेऊन संस्थेचे अध्यक्ष समाजसेवक मा. डॉ. विनोद शाह (MD) व सौ. मीना शाह यांच्या पुढाकारातून महात्मा फुले जनआरोग्य योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत विविध शस्त्रक्रिया तसेच डायलेसिससारख्या महत्त्वाच्या सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

आज दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी आंबी रानवडी येथील मा. सरपंच वंदना निवंगुणे यांचे पती भरत निवंगुणे यांच्यावर डायलेसिस उपचार यशस्वीरीत्या करण्यात आले. या वेळी मेडिकल ऑफिसर डॉ. शरद कदम, व्यवस्थापक अमोल मोरे, मा. श्री. शिंगाडे, डायलेसिस टेक्निशियन श्री. खैराटे, सोनाली सुराणा, गणेश निवंगुणे तसेच नर्सिंग स्टाफ यांनी मोलाची भूमिका बजावली. “गोरगरीबांना दर्जेदार आरोग्यसेवा त्यांच्या दारात मिळाली पाहिजे,” हा ध्यास डोळ्यासमोर ठेवून डॉ. विनोद शाह आणि मीना शाह सातत्याने कार्यरत आहेत. ग्रामीण भागासाठी आरोग्यसेवेचे भक्कम आधारस्तंभ ठरलेल्या या कार्याबद्दल नागरिकांकडून कृतज्ञता व्यक्त केली जात असून त्यांना दीर्घ आयुष्य लाभो, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## 'आरबीआय'च्या नियामक आराखड्याच्या केंद्रस्थानी ठेवीदारांचेच हित : मराठे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




- 'आयएमडीआर'तर्फे 'भारतामधील ठेवीदारांचा आवाज आणि बँक प्रशासन' यावर चर्चासत्र

"ठेवीदार संरक्षण हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) नियामक आणि पर्यवेक्षीय चौकटीच्या केंद्रस्थानी आहे. ठेवीदारांना बँकेच्या संचालक मंडळावर थेट प्रतिनिधित्व नसले, तरी संपूर्ण नियामक रचना ही ठेवीदारांच्या हितांचे संरक्षण आणि वित्तीय स्थैर्य सुनिश्चित करण्यासाठी उभारण्यात आलेली आहे," असे प्रतिपादन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या केंद्रीय मंडळाचे संचालक सतीश मराठे यांनी केले. डेक्कन एज्युकेशन संचालित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्चच्या (आयएमडीआर) वतीने 'भारतामधील ठेवीदारांचा आवाज आणि बँक प्रशासन' या विषयावर आयोजित संशोधन आधारित परिसंवादात सतीश मराठे बोलत होते. या परिसंवादामध्ये वरिष्ठ धोरणनिर्माते, बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक, व्यावसायिक तसेच विद्यार्थी यांनी भारतातील बँक प्रशासनाच्या विकसित होत असलेल्या रचनेवर सखोल चर्चा केली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त विवेक मठकरी, माजी विश्वस्त महेश आठवले, 'आयएमडीआर'च्या संचालिका डॉ. शिखा जैन, माजी विद्यार्थिनी, अल्युमिना कन्सल्टिंगच्या संस्थापक-संचालिका अंजली पाटील आदी उपस्थित होते.

# उपमहापौरांच्या अध्यक्षतेखाली आढावा

## रुग्णालयांना तात्काळ प्रत्यक्ष भेट



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील आरोग्य सेवा अधिक सक्षम व दर्जेदार करण्याच्या उद्देशाने उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीस अति. आयुक्त पवनीत कौर, आरोग्य अधिकारी डॉ. नीना बोऱ्हाडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. संजीव वावरे, परिमंडळ वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक पखाले, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रेमलता घाटे, वैद्यकीय अधिकारी डॉ. गुणेश बागडे तसेच विद्युत व भवन विभागाचे अभियंते आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत शहरातील विविध महापालिका रुग्णालयांमधील प्रलंबित कामे, सेवा विस्तार, आवश्यक दुरुस्ती आणि पायाभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आरोग्य सेवा अधिक परिणामकारक करण्यासाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. बोपोडी येथील संजय गांधी रुग्णालय हे संपूर्णपणे महापालिकेमार्फत चालवून अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी रुग्णालय म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कै. द्रोपदाबाई मुरलीधर खेडेकर रुग्णालय येथे डोळे व दंत उपचार सुविधा सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. औंध रोडवरील कै. बाबुराव गेनबा शेवाळे रुग्णालय या इमारतीचा संपूर्ण उपयोग करून आवश्यक देखभाल व दुरुस्ती करत आरोग्य सेवांचा विस्तार करण्याचे ठरविण्यात आले. तसेच औंध कुटी रुग्णालय येथे नूतनीकरण करून पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याचे निर्देश देण्यात आले. गोरगरिब व सर्वसामान्य नागरिकांना सुलभ, परवडणारी व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून ठोस पावले उचलण्यात येत असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. बैठकीनंतर उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी संबंधित विभागांना सर्व बाबींवर प्राधान्याने तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. तसेच दुपारी १.३० ते ३ या वेळेत संबंधित अधिकाऱ्यांसमवेत वरील सर्व रुग्णालयांना प्रत्यक्ष क्षेत्रभेट देऊन सुधारणा कामांना त्वरित प्रारंभ करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

## ५० लाख विक्रीचा टप्पा गाठला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया, देशातील अग्रगण्य दुचाकी उत्पादक कंपनी,ने महाराष्ट्रात ॲक्टिव्हाच्या एकूण 50 लाख विक्रीचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. भारतातील सर्वात महत्त्वाच्या दुचाकी बाजारपेठांपैकी एक असलेल्या महाराष्ट्रात ब्रँडसाठी ही मोठी कामगिरी मानली जाते. हा ऐतिहासिक टप्पा 25 वर्षांच्या कालावधीत साध्य झाला असून, ग्राहकांचा सातत्यपूर्ण विश्वास आणि बाजारातील मजबूत उपस्थिती याचे हे प्रतीक आहे. ही कामगिरी महाराष्ट्रातील प्रमुख बाजारपेठांमध्ये पुणे, मुंबई, ठाणे, नागपूर आणि नवी मुंबई सातत्यपूर्ण मागणीमुळे शक्य झाली आहे. या शहरांमध्ये दुचाकी हे दैनंदिन प्रवासासाठी व्यवहार्य आणि विश्वासार्ह साधन म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत असून, ते मोबिलिटी ट्रेंड घडवण्यातही पुढाकार घेत आहेत. महाराष्ट्रातील ॲक्टिव्हाच्या वाढीला राज्यभरातील 700 हून अधिक विक्री व सेवा केंद्रांच्या मजबूत ग्राहक जाळ्याचा आधार मिळाला आहे. या विस्तृत उपस्थितीमुळे सुलभ मालकीचा अनुभव, विश्वासार्ह विक्रीनंतरची सेवा आणि ग्राहकांचा दीर्घकालीन विश्वास सुनिश्चित होतो.

# आंबेडकरी चळवळीचे ‘वाघ’ प्रस्थापित पक्षांच्या दावणीला का? आत्मचिंतनाची गरज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




महाराष्ट्राच्या मातीला संघर्षाचा आणि स्वाभिमानाचा मोठा इतिहास आहे. विशेषतः आंबेडकरी चळवळीने या राज्याला विचारांची प्रगल्भता आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ दिले. एकेकाळी ज्या चळवळीचा दबदबा होता, ज्यांच्या एका हाकेवर सत्ताधिशांचे सिंहासन डळमळीत व्हायचे, ती ताकद आज कुठे हरवली? हा प्रश्न आज प्रत्येक निष्ठावान कार्यकर्त्याला सतावतोय. ज्या 'वाघांनी' स्वाभिमानाने सत्ताधिशांना पाणी पाजले, तेच आज भाजप, काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या कळपात कसे सामील झाले? ही 'आधुनिक गुलामी' चळवळीला कोणत्या दिशेला घेऊन जात आहे, यावर आता सविस्तर चर्चा आणि आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे.

**१. दबावाचे राजकारण ते हुजरेगिरीपर्यंतचा प्रवास**

महाराष्ट्रात पूर्वी रिपब्लिकन पक्षाचा मोठा राजकीय प्रभाव होता. प्रस्थापित पक्षांना आंबेडकरी मतपेढीसमोर नतमस्तक व्हावे लागायचे. परंतु, आज चित्र उलटे झाले आहे. चळवळीत तयार झालेले नेतृत्व स्वतःच्या राजकीय अस्तित्वासाठी प्रस्थापित पक्षांच्या दारात उभे असलेले दिसते. ज्या पक्षांना महाराष्ट्रात पाय ठेवायला जागा नव्हती, त्यांनी आज चळवळीतील नेत्यांना आपल्या जाळ्यात ओढून चळवळीची धार बोथट केली आहे.

**२. 'पिंजऱ्यातील पक्षी' आणि शिकारी प्रवृत्ती**

शिकारी जसा एका पक्षाला पकडून त्याला दाणा-पाणी देतो आणि त्याच्या आधारे इतर पक्षांना जाळ्यात ओढतो, तसेच राजकारण सध्या महाराष्ट्रात सुरू आहे. भाजप-काँग्रेस-शिवसेना-राष्ट्रवादी या पक्षांनी चळवळीतील काही चेहऱ्यांना पदे, प्रतिष्ठा आणि सत्तेचे तुकडे देऊन आपल्या 'पिंजऱ्यात' कैद केले आहे. त्यांना पाहून गावागावातील सामान्य कार्यकर्ताही "आपल्या माणसाला तिथे काहीतरी मिळतेय" या आशेने त्या मोठ्या पक्षांच्या मागे धावू लागला आहे. ही हुजरेगिरी चळवळीचा पाया कमकुवत करत आहे.

**३. बिनबुडाच्या 'चमच्यांचे' उदय आणि चळवळीचे नुकसान**

सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे, जे लोक वर्षानुवर्षे जमिनीवर काम करतात त्यांना डावलून, ऐन निवडणुकीच्या तोंडावर 'बिनबुडाचे' लोक आंबेडकरी पक्षात येतात, उमेदवारी मिळवतात आणि दुसऱ्या-तिसऱ्या क्रमांकाची मते घेतात. हेच लोक पुढे जाऊन प्रस्थापित पक्षांचे आमदार होतात. म्हणजे आपली चळवळ ही प्रस्थापित पक्षांसाठी केवळ 'फीडर' किंवा 'नर्सरी' ठरत आहे का? चळवळीचे नुकसान करण्यास हेच संधीसाधू लोक जबाबदार आहेत.

**४. स्वाभिमान हरवलेला कार्यकर्ता**

आंबेडकरी तालमीत तयार झालेला कार्यकर्ता हा विचाराने पक्का असतो. पण जेव्हा हेच कार्यकर्ते प्रस्थापित पक्षांच्या 'ओंजळीने' पाणी पितात, तेव्हा समाजाच्या आशा-आकांक्षांचा खून होतो. लोकप्रतिनिधी हा जात-धर्माच्या पलीकडे असावा हे जरी खरे असले, तरी आपल्या हक्काच्या वाटाघाटी करण्यासाठी आपली स्वतंत्र राजकीय ताकद असणे गरजेचे आहे, हे आपण विसरता कामा नये. आज महाराष्ट्रात आंबेडकरी राजकीय चळवळीच्या पडझडीला आपण स्वतःही कुठेतरी जबाबदार आहोत. जोपर्यंत आपण सत्तेच्या मोहापायी प्रस्थापित पक्षांच्या दावणीला बांधले जाऊ, तोपर्यंत समाजाचा खरा विकास होणार नाही. आपण शिकारीच्या पिंजऱ्यातील 'पाळलेले' पक्षी व्हायचे की आकाशात झेप घेणारे 'मुक्त स्वाभिमानी वाघ' राहायचे, हे आता ठरवावे लागेल. महाराष्ट्रातील गावागावात पसरलेल्या कार्यकर्त्यांनी आता ही 'आधुनिक गुलामी' झुगारून देण्याची वेळ आली आहे. अन्यथा, इतिहास आपल्याला माफ करणार नाही.




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. ०२ मार्च २०२६






## विजयराव देशमुख यांच्या निधनाने मोठी पोकळी : खासदार डॉ. मेधा कुलकर्णी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या जन्मतारीख व तिथीचे शास्त्रशुद्ध संशोधन करून ‘शककर्ते शिवराय’ या द्विखंडात्मक ग्रंथातून मांडणी करणारे शिवकथाकार विजयराव देशमुख (धर्मभास्कर सद्गुरुदास महाराज) हे अलौकिक व्यक्तिमत्व होते. त्यांच्या निधनाने ऐतिहासिक व आध्यात्मिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले.



भारतीय इतिहास संशोधक मंडळाच्या वतीने आयोजित श्रद्धांजली सभेत त्या बोलत होत्या. यावेळी मंडळाचे कार्यवाह पांडुरंग बलकवडे, दुर्गमहर्षी प्रा. के. घाणेकर, छत्रपती सेवा प्रतिष्ठानचे विश्वस्त मनीष उद्धव तसेच ‘पत्रभेट’ मासिकाच्या मुख्य संपादिका सौ. प्रज्ञा फडणीस व्यासपीठावर उपस्थित होत्या.

डॉ. कुलकर्णी म्हणाल्या की, सुमारे ४५ ते ५० वर्षांपूर्वी नागपूर येथे राहून विजयराव देशमुख यांनी संशोधनाधिष्ठित पद्धतीने शिवचरित्राची मांडणी केली. १९८० मध्ये प्रथम प्रकाशित झालेल्या ‘शककर्ते शिवराय’ या ग्रंथामुळे इतिहास संशोधनाला नवे अधिष्ठान मिळाले. प्रा. के. घाणेकर यांनी सांगितले की, रिझर्व्ह बँकेतील नोकरी सांभाळत त्यांनी संशोधक, साहित्यिक, इतिहासकार आणि पुढे आध्यात्मिक मार्गदर्शक म्हणून कार्य केले. दोन भिन्न क्षेत्रांत त्यांनी उभे केलेले कार्य अचंबित करणारे आहे. गेल्या पन्नास वर्षांपासून त्यांच्याशी असलेले निकटचे संबंध वडिलकीच्या नात्यासारखे होते, असे त्यांनी नमूद केले.

छत्रपती सेवा प्रतिष्ठानचे विश्वस्त मनीष उद्धव म्हणाले की, विजयराव देशमुख यांनी निष्ठा, निर्धार आणि निष्कामता या गुणांनी अस्सल शिवचरित्राचे लेखन केले. तब्बल १२५० पानांचा ग्रंथ कोणतेही मानधन न घेता केवळ ५०० रुपयांत उपलब्ध करून देणे हे ऐतिहासिक साहित्यविश्वातील विरळ उदाहरण आहे. अध्यक्षीय भाषणात पांडुरंग बलकवडे यांनी विजयराव देशमुख यांच्या मंडळाशी असलेल्या जुन्या संबंधांचा आढावा घेतला. अशा थोर इतिहासकाराच्या सहवासात येणे हे भाग्य असल्याचे सांगून त्यांच्या दाखविलेल्या मार्गावर चालण्याचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले. सद्गुरुदास महाराजांच्या कन्या व ‘पत्रभेट’च्या मुख्य संपादिका सौ. प्रज्ञा फडणीस यांनी सांगितले की, त्यांनी ऐतिहासिक व आध्यात्मिक विषयांवर विपुल ग्रंथसंपदा निर्माण केली असून आयुष्यभर पुरेल अशी ज्ञानशिदोरी समाजाला दिली आहे.

या सभेत शाहीर हेमंतराजे मावळे, मिलिंद एकबोटे, संदीप तापकीर, मारुती आबा गोळे, राज मेमाणे, डॉ. महेश बुलाख, विंग कमांडर (निवृत्त) शशिकांत ओक, संतोष देशपांडे आदी मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली. अभिनेत्री व लेखिका मृणाल कुलकर्णी तसेच इतर मान्यवरांचे शोकसंदेश वाचून दाखविण्यात आले. सूत्रसंचालन गुरुप्रसाद कानिटकर यांनी केले. सभेची सांगता एक मिनिट मौन पाळून व शांतीमंत्र पठणाने करण्यात आली.

## गोपाळवाडी गावच्या सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

गोपाळवाडी येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या ग्राम वाचनालयाचा उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडला. कार्यक्रमास गावातील मान्यवर, महिला, युवक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री सुनीलजी पवार साहेब तसेच शरदजी दरेकर सर यांच्या उपस्थितीत पार पडला .पाहुण्यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की,“वाचन संस्कार समाजाच्या प्रगतीचा पाया आहे. ज्ञानामुळेच व्यक्ती आणि गाव दोन्ही सक्षम होतात.”

सदर ग्राम वाचनालयामध्ये विविध विषयांवरील पुस्तके, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन साहित्य, दैनिक वृत्तपत्रे व मासिके उपलब्ध करून देण्यात आली असून विद्यार्थी व युवकांसाठी हे ज्ञानाचे केंद्र ठरणार आहे. या वाचनालयासाठी गावातील अनेक मान्यवरांनी पुस्तके दान करून आपले मोलाचे योगदान दिले आहे, त्यासाठी संपूर्ण आठवडाभर पुस्तक दान अभियान राबवण्यात आले होते. या अभियानाला देखील गावातून खूप मोठा प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमास ग्रामपंचायत अधिकारी झुंबरराव होळकर, शरद होले,सामाजिक कार्यकर्ते भीमराव होले, मयूर शिंदे,पोपट गिरमे, सुरेश काळे, दत्तात्रय जगताप, अर्जुन गायकवाड, भगवान टेकावडे, निलेश शेंडे, अमोल पाडुळे,केशव गिरमे,पोपट भुजबळ ,महेश माने, संदीप होले,दत्तात्रय गिरमे ,नाना होले, संतोष गदादे, रघु सूळ, राहुल शिंदे, पांडुरंग लोणकर, अंकुश गाढवे ,अश्विनी होटकर आदी मान्यवर उपस्थित होते, रघु सूळ यांनी पुस्तक वाचनाचे महत्त्व पटवून दिले तर किशोरजी टेकवडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करीत मान्यवरांसहित उपस्थित सर्वांचे स्वागत केले तर दत्तात्रय जगताप यांच्या वतीने सर्व मान्यवर व ग्रामस्थांचे आभार मानण्यात आले.

## ऑफिशियल स्पोर्ट्स ड्रिंक म्हणून पॉवरेडचे आगमन

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

कोका-कोला कंपनीचा आयकॉनिक स्पोर्ट्स हायड्रेशन ब्रॅण्ड पॉवरेडने जगातील काही सर्वात लक्षणीय इव्हेन्ट्सपैकी एक असलेल्या आयसीसी मेन्स टी२० वर्ल्ड कपमध्ये पदार्पण केले आहे. क्रीडा, ॲक्टिव्हिटी आणि बदलत्या जीवनशैलींमध्ये रुजलेल्या ब्रॅण्ड्सच्या साथीने आपल्या पोर्टफोलिओचा विस्तार करण्यावरील कोका-कोला इंडियाचा भर या सामन्यांचे ऑफिशियल स्पोर्ट्स ड्रिंक म्हणून पॉवरएडच्या उपस्थितीमुळे नव्याने अधोरेखित झाला आहे. स्पोर्ट्स हायड्रेशन सोल्यूशन म्हणून डिझाइन करण्यात आलेल्या पॉवरएडमध्ये व्हिटॅमिन B3 आणि इलेक्ट्रोलाइट्स आहेत, जे खेळांच्या सादरीकरणासाठी लागणारी ऊर्जा पुरवितात, त्यामुळे हे ड्रिंक




खडतर प्रशिक्षण, स्पर्धात्मक खेळ आणि सक्रिय जीवनशैलीसाठी साजेसे ठरते. पॉवरएड माऊंटन ब्लास्ट (ब्लू) आणि फ्रूट पंच (रेड) अशा दोन फ्लेवर्समध्ये व कमी कॅलरी असलेल्या फॉर्म्युलेशनसह बाजारात दाखल करण्यात आले आहे, ज्यात ग्राहकांची बदलती पसंत प्रतिबिंबित झाली आहे. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी अहमदाबादमध्ये भारताच्या प्रमुख सुपर ८ मॅचदरम्यान मैदानावर केलेल्या एका अत्यंत प्रभावी जाहिरातीच्या रूपात या उत्पादनाचे पदार्पण झाले.

## ३ ते ४ वर्षात उत्पादन क्षेत्रात मोठी वाढ अपेक्षित - बाबा कल्याणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारत एका महत्त्वाच्या टप्प्यावर असून उत्पादन क्षेत्रात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे,असे मत भारत फोर्ज लि.चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी यांनी व्यक्त केले. भारतीय परराष्ट्र मंत्रालय आणि पुणे इंटरनॅशनल सेंटर (पीआयसी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सातव्या आंतरराष्ट्रीय एशिया इकॉनॉमिक डायलॉग (एईडी) परिषदेच्या दुसऱ्या दिवशी फायरसाईड चॅट या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. एशिया इकोनॉमिक डायलॉग 2026 चे संयोजक ॲम्बेसिडर गौतम बंबावाले (निवृत्त) व पीआयसीचे माजी संचालक मेजर जनरल नितीन गडकरी (निवृत्त) यांनी त्यांच्याशी संवाद साधला. 1991 च्या आर्थिक उदारीकरणानंतरचा प्रवास सांगत संरचनात्मक बदल आणि सुधारणांचा आढावा घेत बाबा कल्याणी म्हणाले की, पुढील तीन ते चार वर्षात संरक्षण उत्पादनासह एकंदर उत्पादन क्षेत्रात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे.

## हरताळ्यात आता तरी पिंजरा लागणार का?

**मुक्ताईनगर (दै. आरंभ पर्व)**

येथील परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला असून, गट नंबर ६६ मधील शेतकरी अशोक बालचंद्र धबाडे यांच्या मालकीच्या शेतात घुसून एका वळूचा शिकार केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण गाव आणि शेतकरी वर्गामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, वनविभागाने तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धबाडे यांचे शेत जंगलाला लागून आहे. रात्रीच्या सुमारास त्यांनी आपला वळू शेतात बांधला होता. मध्यरात्री



बिबट्याने या वळूवर अचानक हल्ला चढवला. यावेळी परिसरात गस्त घालणाऱ्या शेतकऱ्यांना प्राण्यांचा मोठा आवाज ऐकू आल्याने त्यांनी आवाजाच्या दिशेने धाव घेतली. मात्र, तोपर्यंत बिबट्याने वळूला ठार केले होते. शेतकऱ्यांचा सुगावा लागताच बिबट्या अंधाराचा फायदा घेत जंगलाच्या दिशेने पसार झाला. या घटनेची माहिती मिळताच वनरक्षक दीपाली बेलदार यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी सदर हल्ला बिबट्यानेच (वाघ सदृश प्राणी) केल्याची खात्री केली असून, बिबट्याच्या हालचाली टिपण्यासाठी परिसरात ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले आहेत. वनविभागामार्फत नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, रात्रीच्या वेळी जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत आणि एकट्याने घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. सामाजिक कार्यकर्ते प्रदीप काळे यांनी जिल्हा वनसंरक्षक राम धोत्रे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून परिसरात तात्काळ पिंजरा लावण्याची आग्रही मागणी केली आहे. वारंवार होणाऱ्या या हल्ल्यांमुळे पशुपालकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, नरभक्षक होण्यापूर्वीच बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## महाराष्ट्राला हिंदी नाही तर देशाला मराठी शिकण्याची गरज

### शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

**(दै. आरंभ पर्व)**


भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाणारी मुंबई आणि वेगाने वाढणारे औद्योगिक-शैक्षणिक केंद्र पुणे यांसारख्या शहरांमुळे महाराष्ट्र आज देशातील सर्वात मोठ्या रोजगारकेंद्रांपैकी एक बनला आहे. उद्योग, आयटी, चित्रपटसृष्टी, बांधकाम, शेती-प्रक्रिया, सेवा क्षेत्र. अशा असंख्य क्षेत्रांत देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक येथे येतात आणि कष्ट करून आपले व कुटुंबाचे आयुष्य घडवतात. अशा परिस्थितीत एक प्रश्न वारंवार उपस्थित होतो. जर अर्धा देश महाराष्ट्रात येऊन कष्ट करत असेल, तर देशाला मराठी शिकण्याची गरज नाही का?

**१) महाराष्ट्र: संधींचे प्रवेशद्वार**

महाराष्ट्रात दरवर्षी लाखो लोक रोजगार, शिक्षण आणि व्यवसायासाठी स्थलांतर करतात. मुंबईतील आर्थिक क्रियाकलाप, पुण्यातील आयटी व ऑटोमोबाईल उद्योग, नाशिक-औरंगाबादमधील उत्पादनक्षेत्र, कोकणातील बंदरे. या सर्वांमुळे राज्याचे राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान मोठे आहे. या सर्व घडामोडींमध्ये विविध भाषिक पार्श्वभूमीचे नागरिक सहभागी असतात. त्यामुळे बहुभाषिक सहजीवन ही महाराष्ट्राची ताकद ठरते; पण त्याचवेळी स्थानिक भाषेचा सन्मान व वापर यांचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो.

**२) भाषा म्हणजे केवळ संवाद नाही. ओळख आहे**

मराठी ही केवळ व्यवहाराची भाषा नसून ती संस्कृती, परंपरा आणि इतिहासाची वाहक आहे. संत साहित्य, लोकनाट्य, वाङ्मय, स्वातंत्र्यचळवळीतील योगदान. या सर्वांचा आत्मा मराठीत आहे. स्थानिक प्रशासन, कायदे, सामाजिक रचना आणि लोकजीवन समजून घेण्यासाठी मराठीचे ज्ञान उपयुक्त ठरते.



एखादा नागरिक जेव्हा ज्या राज्यात राहतो, तेथील भाषा शिकण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा तो त्या भूमीचा सन्मान करतो. त्यामुळे सामाजिक समन्वय वाढतो, गैरसमज कमी होतात आणि परस्पर आदर दृढ होतो.

**३) हिंदी की मराठी. विरोध नव्हे, संतुलन**

हा मुद्दा “हिंदी विरुद्ध मराठी” असा मुळीच नाही. हिंदी ही भारतातील संपर्कभाषा मानली जाते; अनेक राज्यांत ती व्यवहारासाठी सोयीची ठरते. परंतु महाराष्ट्रात राहणाऱ्या नागरिकांनी मराठी शिकणे ही नैसर्गिक अपेक्षा आहे.

जगभरात ज्या देशात/राज्यात आपण काम करतो, तेथील स्थानिक भाषा शिकणे हे सामान्य शिष्टाचार मानले जाते. मग भारतातच ही अपेक्षा चुकीची कशी ठरेल?

स्थानिक भाषा + संपर्कभाषा असे संतुलन राखले, तर राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट होईल.

**४) रोजगार व प्रशासनात मराठीचे महत्त्व**

सरकारी कागदपत्रे, स्थानिक स्वराज्य संस्था, न्यायालयीन प्रक्रिया, पोलीस यंत्रणा. यांमध्ये मराठीचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. कामगार, लघुउद्योजक, सेवा क्षेत्रातील कर्मचारी यांना दैनंदिन व्यवहारात मराठीचे ज्ञान उपयुक्त ठरते.

मराठी समजल्यास ग्राहकांशी संवाद सुधारतो, स्थानिक बाजारपेठेची समज वाढते आणि विश्वास निर्माण होतो. त्यामुळे आर्थिकदृष्ट्याही मराठी शिकणे फायदेशीर आहे.

**५) मराठी शिकणे अवघड नाही**

आज डिजिटल साधने, ऑनलाईन कोर्सेस, मोबाईल ॲप्स आणि स्थानिक वर्ग यांच्या माध्यमातून मराठी शिकणे सोपे झाले आहे. प्राथमिक पातळीवर संवाद साधता आला तरी सामाजिक स्वीकार वाढतो. स्थानिक सण-उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, साहित्य संमेलन, नाटक-चित्रपट यांत सहभागी होताना भाषा आपोआप आत्मसात होते.

**६) राष्ट्रीय एकात्मतेचा नवा अर्थ**

“देशाला मराठी शिकण्याची गरज आहे” या विधानाचा अर्थ असा नाही की सर्वांनी मराठीच बोलावी; तर जिथे आपण राहतो, काम करतो, त्या भूमीची भाषा आणि संस्कृती स्वीकारावी. भारत हा विविधतेत एकता मानणारा देश आहे. प्रत्येक राज्याच्या भाषेला समान सन्मान मिळाल्यास खरी राष्ट्रीय एकात्मता घडेल. महाराष्ट्रात येणाऱ्यांनी मराठी शिकावी, तसेच महाराष्ट्रातील लोकांनी इतर भाषांचा आदर करावा. हे दोन्ही समान महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्र देशाच्या प्रगतीचे महत्त्वाचे इंजिन आहे. येथे येऊन कष्ट करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे योगदान अमूल्य आहे. परंतु ज्या मातीत आपण घाम गाळतो, तिची भाषा जाणून घेणे हे कर्तव्य आणि सन्मान दोन्ही आहे. मराठी शिकणे म्हणजे केवळ शब्द शिकणे नव्हे; तर महाराष्ट्राच्या संस्कृतीशी नाते जोडणे आहे. आणि जेव्हा प्रत्येकजण स्थानिक भाषेला सन्मान देईल, तेव्हा “एक भारत, श्रेष्ठ भारत” ही संकल्पना अधिक अर्थपूर्ण ठरेल.




## थोडक्यात पण महत्वाचे



### मातोश्री पार्वतीबाई कुंभार प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

दौंड (आरंभ पर्व) : दौंड शहरातील मातोश्री पार्वती बाई कुंभार प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव श्री सुभाष गणपतराव डावरे कार्यक्रमास उपस्थित शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ.कविताताई डावरे भारतीय पत्रकार सघांचे पुणे जिल्हा कार्यध्यक्ष तथा गोपाळवाडी गावचे महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष राजेंद्र सोनवलकर, लिगाळीच्या पोलीस पाटील नीता वाघमारे,उपाध्यक्ष श्री. संतोष व्हांकडे, विलास लोंदे व संतोष जाधव मयूर साळवी हे पत्रकार बंधू उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग श्री प्रवीण सुरवसे व ज्योती वाघ यांनी केले उपस्थित आमचे स्वागत मुख्याध्यापक श्री संभाजी थोरात यांनी केले अहवाल वाचन श्री रोहिणी अहिवळे यांनी केले. कार्यक्रमासाठी भरपूर गर्दी जमा झाली होती तसेच जेजुरीचा खंडोबा व स्वराज्य रक्षक धर्मवीर संभाजी महाराज यांचा जिवंत देखावा अप्रतिमरीत्या सादर करण्यात आला त्याला उपस्थितांनी चांगली दाद दिली सर्व विद्यार्थ्यांना डान्स मध्ये श्री प्रदीप मदने व त्यांच्या सहकार्याने मदत केली कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सौ सीमा शिंदे सौ अपर्णा गायकवाड सौ मंगल ढगे, इरफाना शेख व श्री दत्तात्रय राऊत व श्री अनुराग सरोदे यांनी सहकार्य केले.

### मानव केंद्रित कृत्रिम बुध्दिमत्तेची गरज

पुणे (आरंभ पर्व) : भीती आणि प्रचाराच्या पलीकडच्या मानव केंद्रित कृत्रिम बुध्दिमत्तेची गरज असल्याचे मत एशिया इकोनॉमिक डायलॉग 2026 मधील तज्ञांनी व्यक्त केले. भारतीय परराष्ट्र मंत्रालय आणि पुणे इंटरनॅशनल सेंटर (पीआयसी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सातव्या आंतरराष्ट्रीय एशिया इकॉनॉमिक डायलॉग (एईडी) परिषदेच्या दुसऱ्या दिवशी डयुएल इंटेलिजन्स या विषयावरील चर्चासत्रात 5एफ वर्ल्डचे अध्यक्ष डॉ.गणेश नटराजन यांनी अध्यक्षपद भूषविले.याप्रसंगी पीओएसएचएस ग्रुपचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम पुरी,ला-प्रो चे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी विजय संपत आणि झेडएस असोसिएटसचे भागीदार डॉ.पी.के.एस प्रकाश यांनी सहभाग घेतला. डॉ.गणेश नटराजन म्हणाले की,एआय कडे कधी आपण जादुई शक्ती तर कधी भीतीने पाहतो.नवोपक्रम भूतकाळ पुसून टाकत नाही,तो त्यावर आधारित राहत पुढील विकास करतो.त्यामुळे अनेक वर्षांचा वारसा असलेल्या संस्थांनी नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेऊन पुढील विकास करणे आवश्यक आहे. विक्रम पुरी म्हणाले की, तंत्रज्ञानामधील सार्वभौमत्व ही केवळ घोषणा नसून ती एक गरज आहे. भारताने एआय ला आपली ताकद वाढविण्यासाठी एक गुणक प्रभावी शक्ती म्हणून पाहिले पाहिजे.एआय कडे शत्रू म्हणून कमी आणि साधन म्हणून जास्त पाहिले पाहिजे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## एसटी बस स्थानकावर 'मराठी'चा जागर

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : राजगुरुनगर येथील राजगुरुनगर एसटी बस स्थानकावर कर्मचारी व प्रवाशांच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने विविध विषयांवर मनोगत आवडत्या पुस्तकांचा परिचय, काव्यवाचन इत्यादी उपक्रम राबविण्यात येऊन मायमराठीचा जागर करण्यात आला. कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला स्थानक प्रमुख उत्तम लांडे यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी जेष्ठ पत्रकार किरण खुडे, वाहतूक निरीक्षक नासिर हवालदार, सहाय्यक वाहतूक निरीक्षक एम. एफ. सय्यद, कार्यशाळा अधिक्षक अनंत कुंदे, लेखापाल हिरामण दिघे, वरिष्ठ लिपीक स्नेहा कातोरे, वाहतूक नियंत्रक विष्णू राठोड, रोहीणी साबळे, स्वाती बिराजदार, मनिषा सुतार, विजया बगाटे, गोविंद वरे, पी.ए.किर्दक, बबलू दौंडकर, पवार, महेश बिरदवडे, एस. एम. मोसे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना विष्णू राठोड म्हणाले की, मराठी भाषा गौरव दिन म्हणजे आपल्या मायबोलीचा सन्मान करण्याचा आणि समृद्ध वाटचालीला उजाळा देण्याचा दिवस आहे. स्वतःची भाषा विकसित करा, चांगले मराठी प्रयत्नपूर्वक ऐका व बोला असे त्यांनी प्रवाशांना आवाहन केले. स्नेहा कातोरे यांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारसा पुढे नेणाऱ्या कुसुमाग्रजांच्या साहित्यिक योगदानाचा आढावा घेतला. त्यांची कविता काळाशी लढण्याचे बळ देते, असे त्या म्हणाले. लेखापाल हिरामण दिघे यांनी मराठी आवडत्या पुस्तकांचा परिचय करून दिला. यावेळी मान्यवर लेखकांच्या पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. 'लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी ' या गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन एम. एफ. सय्यद यांनी केले.

## नेटफ्लिक्सने 'हॅलो बच्चो'चा ट्रेलर रिलीज केला



पुणे(आरंभ पर्व) : हॅलो बच्चो- हा फक्त वर्गात उच्चारला जाणारा शब्द नाही, तर नवीन विचार आणि प्रेरणेचे प्रतीक आहे. नेटफ्लिक्सने आपल्या नव्या सिरीजचा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. ही सिरीज शिक्षक अलख पांडे यांच्या खास प्रवासावर आधारित आहे, ज्यांचा प्रभाव केवळ वर्गापुरता मर्यादित राहिला नाही, तर भारतातील अनेक विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत आणि मनापर्यंत पोहोचला आहे. 6 मार्च रोजी प्रीमियर होणारी ही सिरीज अशा विद्यार्थ्यांची कथा सांगते ज्यांनी आपली स्वप्ने कधीही सोडली नाहीत. त्यांच्या शिक्षकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि त्याच विश्वासामुळे त्यांना पुढे जाण्याची ताकद आणि धैर्य मिळाले. एका साध्या वर्गातील छोट्या सुरुवातीपासून सुरू झालेली ही कथा पुढे एक मोठी चळवळ बनते. ही पहल शहरांपासून गावांपर्यंत आणि छोट्या गल्लीबोळांपर्यंत पोहोचते. ट्रेलरमध्ये विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या कथा दाखवल्या आहेत, पण त्यांना एकत्र जोडणारे एकच स्वप्न आहे.

# सापडलेला मोबाईल मालकाला परत



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील राजगुरूनगर एसटी बस स्थानकावर सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक यांचा सापडलेला महागडा मोबाईल फोन पेपरविक्रेते सुरेश ढमाले यांनी पोलीसांना माहीती देऊन वाहतूक नियंत्रक कार्यालयात सुपूर्द केला. त्यानंतर स्थानक प्रमुख व पोलीस यांनी संबंधीत मोबाईलच्या मालकाचा शोध घेऊन त्यांना तो परत केला. पेपरविक्रेते ढमाले यांच्या या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शुक्रवारी (दि. २७ ) सकाळी बसस्थानकाजवळ नियमीत पेपर विक्री करत असताना ढमाले यांना कट्ट्यावर वर्दळीच्या ठिकाणी एक मोबाईल फोन पडलेला दिसून आला. त्यांनी इतर प्रवाशांकडे चौकशी केली असता त्यांना त्याबाबत काहीच माहीती मिळाली नाही. त्यांनी संबंधीत मोबाईलवर कुणाचा फोन येत आहे का? याची खूप वेळ वाट पाहिली. त्यानंतर त्यांनी बसस्थानकावरील कर्तव्यास असलेले पोलीस नाईक जीजाबापू बिडकर यांना याविषयी माहिती दिली. व त्यांनतर स्थानक प्रमुख उत्तम लांडे यांच्याकडे मोबाईल सुपूर्द केला. दरम्यान, या मोबाईल फोनवर मूळ मालक व सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक सुधाकर फापाळे (रा. राजगुरुनगर नजीक पानमळा, ता.खेड) यांचा फोन आला. त्यानंतर त्यांना वाहतूक नियंत्रक कार्यालयात बोलावून घेतले. व मोबाईल फोनची ओळख पटवून तो फोन फापाळे यांच्या ताब्यात दिला. यावेळी स्थानक प्रमुख उत्तम लांडे, पोलीस नाईक जीजाबापू बिडकर, पेपरविक्रेते ढमाले, ह.भ.प. नामदेव महाराज कहाणे उपस्थित होते.

प्रवासादरम्यान गाडीची वाट पाहत असताना नकळत विस्मरण झाल्याने मोबाईल फोन विसरल्याचे त्यांच्या नंतर लक्षात आले होते. वीस हजार रुपये किंमतीचा मोबाईल असल्याचे त्यांनी सांगितले. फापाळे यांनी याबाबत पेपरविक्रेते ढमाले, स्थानक प्रमुख उत्तम लांडे, पोलीस नाईक जीजाबापू बिडकर यांचे आभार मानले. या कामगीरीबद्दल राजगुरूनगर एसटी आगाराचे वरीष्ठ आगारव्यवस्थापक विद्या कदम, कनिष्ठ आगारव्यवस्थापक उज्वला कुटे, वाहतूक निरीक्षक नासिर हवालदार, सहायक वाहतूक निरीक्षक एम. एफ. सय्यद, कामगार संघटनेचे गजानन सांडभोर, दत्ता गभाले यांनी कौतूक केले.

## एशिया इकॉनॉमिक डायलॉग २०२६ चे पुण्यात उदघाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उदारमतवादी आंतरराष्ट्रीय व्यवस्था कमकुवत होत असताना व संपूर्ण जग भू-राजकीय व भू-आर्थिक पुनर्रचनेकडे वळण घेत असताना अभिनवतेची परिसंस्था अधिक दृढ केल्यास आणि लवचिकता दर्शविल्यास भारताला भू-आर्थिक व्यवस्थेला आकार देण्याची,जागतिक भागीदारी वाढविण्याची आणि विकसित होत असलेल्या जागतिक व्यवस्थेत एक प्रमुख भूमिका बजवायची संधी मिळू शकते,असे विविध तज्ञांनी व्यक्त केले. भारतीय परराष्ट्र मंत्रालय आणि पुणे इंटरनॅशनल सेंटर (पीआयसी) यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील पाषाण येथील पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या कन्व्हेंशन हॉल येथे 26 फेब्रुवारी ते 28 फेब्रुवारी 2026 दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या सातव्या आंतरराष्ट्रीय एशिया इकॉनॉमिक डायलॉग (एईडी) परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. जिओ इकोनॉमिक्स बियाँड ग्लोबलायझेशन - टेरिफ, टेक्नोलॉजीज ॲन्ड स्ट्रॅटेजिक अलाइनमेंट या संकल्पनेवर आधारित एईडी 2026 मध्ये 12 आंतरराष्ट्रीय सत्रे होणार असून भारत,भूतान,श्रीलंका,तैवान,सिंगापूर,केनिया, ऑस्ट्रेलिया आणि नॉर्वे सह 9 देशांतील 45 हून अधिक वक्ते सहभागी झाले आहेत. यामध्ये धोरणकर्ते,अभ्यासक आणि उद्योगतज्ञ यांचा सहभाग असेल. उद्घाटनप्रसंगी प्रख्यात शास्त्रज्ञ व पुणे इंटरनॅशनल सेंटरचे अध्यक्ष डॉ.रघुनाथ माशेलकर, पीआयसीचे संचालक दिनानाथ खोलकर, एशिया इकोनॉमिक डायलॉग 2026 चे संयोजक ॲम्बेसिडर गौतम बंबावाले (निवृत्त) आदी मान्यवर उपस्थित होते.

## उत्कर्ष आणि कोटक यांची स्ट्रॅटेजिक भागीदारीची घोषणा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड ("उत्कर्ष एसएफबीएल") ने आज कोटक महिंद्रा लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ("कोटक लाईफ") सोबत स्ट्रॅटेजिक भागीदारीची घोषणा केली, जी बँकेच्या उत्पादन विस्तार धोरणातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. हे सहकार्य उत्कर्ष एसएफबीएलच्या जीवन विमा क्षेत्राला लक्षणीयरीत्या बळकट करते आहे, कोटक लाईफचे सर्वसमावेशक उत्पादन संच बँकेच्या 27 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील 1105 बँकिंग आउटलेट्समध्ये इंटिग्रेट करते. या करारामुळे उत्कर्ष एसएफबीएलच्या 51.4 लाख ग्राहकांना फायदा मिळण्याची योजना आहे, ज्यांना विविध प्रकारची अनुकूल जीवन विमा उत्पादने आणि उपाय प्रदान केले जातील,

ज्यामध्ये कोटक लाईफद्वारे दिले जाणारे संरक्षण, बचत, युनिट-लिंक्ड आणि सेवानिवृत्ती यांचा समावेश असेल. भागीदारीबद्दल बोलताना, श्री. गोविंद सिंग, व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ, उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड म्हणाले: "ही भागीदारी आमच्या ग्राहकांना सर्वांगीण आर्थिक उपाय प्रदान करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकट करते.

## लोणी काळभोर येथे पाणीपुरवठा पाईपलाईन कामाचे भूमिपूजन

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**



तीव्र उष्णतेमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर लोणी काळभोर येथील रायवाडी टाकेमाळ व गाव परिसरात नवीन पाणीपुरवठा पाईपलाईन टाकण्याच्या कामाचे भूमिपूजन उत्साहात संपन्न झाले. गाव तेथे पाणी या संकल्पनेअंतर्गत हाती घेण्यात आलेल्या या कामामुळे गावातील नागरिकांना पाण्याचा नियमित व सुरळीत पुरवठा होण्यास मदत होणार आहे. वाढत्या उष्णतेमुळे निर्माण झालेली पाणीटंचाई लक्षात घेऊन हे काम तातडीने सुरू करण्यात आले असल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले. भूमिपूजन प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेचे संचालक प्रशांतदादा काळभोर, जिल्हा परिषद सदस्या सौ. शितलताई सुजित कांबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय तात्या गायकवाड, माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर काळभोर, प्रताप बोरकर, बाळासाहेब काळभोर, सुभाष काळभोर, पांडुरंग केसकर, गुरुदेव काळभोर, अमोल कोळपे, रमेश भोसले, युवराज काळभोर, प्रशासक सरपंच नागेश अंकुशराव काळभोर, माजी सरपंच राजाराम बापू काळभोर, माजी सरपंच राहुल भाऊ काळभोर, ग्रामपंचायत अधिकारी एस. एन. गवारी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पाणीपुरवठा योजनेमुळे रायवाडी टाकेमाळ व लोणी काळभोर गावातील नागरिकांची पाणीटंचाई दूर होण्यास मोठी मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. ग्रामस्थांनी काम लवकर पूर्ण करून नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

## रमजान एनर्जी गाइड : उपवास दरम्यान सक्रिय कसे राहावे

### ऋतिका समद्दार, रीजनल हेड, डायटेटिक्स, मॅक्स हेल्थकेअर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पवित्र रमजान महिना आध्यात्मिकता, चिंतन आणि समाजभावनेचा काळ आहे. ३० दिवस सकाळपासून संध्याकाळपर्यंत उपवास ठेवणे शारीरिकदृष्ट्या थकवणारे वाटू शकते, विशेषतः मातांसाठी, कॉलेज विद्यार्थ्यांसाठी आणि दैनंदिन जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या व्यावसायिकांसाठी. दिवसभर सतत ऊर्जा टिकवण्यासाठी की गुरुकिल्ली म्हणजे विचारपूर्वक नियोजित सहरी.

सहरीमध्ये लक्ष संतुलित आणि हळूहळू ऊर्जा देणाऱ्या अन्नावर असावे, जे दिवसभर ताकद टिकवून ठेवण्यास मदत करते आणि थकवा टाळतो. पोषक घटकांनी भरलेले अन्न शरीराला सतत ऊर्जा देते आणि लांब वेळा पोट भरलेले असल्याची भावना निर्माण करते. दुसरीकडे, दिवसाची सुरुवात तळलेले किंवा खूप गोड अन्न खाल्ल्यास ऊर्जा सुरुवातीला वाढते पण नंतर अचानक कमी होते. यामुळे दिवस वाढत जाईल तसेच थकवा आणि तहान अधिक जाणवू शकतो.

सहरीमध्ये विचारपूर्वक आणि पौष्टिक अन्न निवडल्यास उपवास ठेवणे सोपे आणि ऊर्जावान वाटू शकते. दिवसभर सतत ऊर्जा टिकवण्यासाठी या पाच अन्नपदार्थांना आपल्या सहरीमध्ये समाविष्ट करा:

**कॅलिफोर्निया बदाम :** बदामामध्ये व्हिटामिन B2, व्हिटामिन E, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस मुबलक प्रमाणात असतात, जे अन्नातून ऊर्जा मिळवण्याच्या प्रक्रियेत मदत करतात. हे शरीराला निरोगी आणि टिकाऊ ऊर्जा देतात, ज्यामुळे आपण दिवसभर सक्रिय राहू शकता. सहरीमध्ये कॅलिफोर्निया बदामांचा समावेश करणे, मग त्यांना रात्रीभर भिजवून खाल्लं किंवा स्मूदीमध्ये घालून खाल्लं, लांब वेळा उपवास ठेवताना ऊर्जा स्तर स्थिर ठेवण्यास मदत करू शकते.

**ओट्स :** दूध किंवा वनस्पतीजन्य पर्यायांसह तयार केलेले ओट्स जटिल कार्बोहायड्रेट आणि फायबर देतात. हे ऊर्जा हळूहळू जारी करण्यास मदत करते, ज्यामुळे पोट लांब वेळा भरलेले राहते आणि दुपारी येणाऱ्या थकव्यापासून बचाव होतो.

**अंडी :** अंड्यांमध्ये उच्च दर्जाचे प्रोटीन आणि आवश्यक अमिनो ॲसिड मुबलक प्रमाणात असतात. मग तुम्ही त्यांना उकडून खाल्लात, स्क्रॅम्बल केले किंवा भाज्यांसह ऑम्लेटमध्ये घेतले, अंडी लांब वेळा पोट भरलेले ठेवण्यास मदत करतात आणि स्नायूंच्या आरोग्याचा आधार देखील देतात.

**ग्रीक योगर्टसह बियाणे :** ग्रीक योगर्ट प्रोटीन आणि प्रोबायोटिक्सने समृद्ध असतो. यात चिया किंवा फ्लॅक्ससीड्स मिसळल्यास फायबर आणि हेल्दी फॅट वाढतात, जे पचन सुधारतात आणि संपूर्ण दिवस शरीराला सक्रिय ठेवतात.


**केळी :** केळी नैसर्गिक साखर, पोटॅशियम आणि फायबरने समृद्ध असतात. हे त्वरीत आणि संतुलित ऊर्जा देतात आणि उपवास दरम्यान इलेक्ट्रोलाइट पातळी राखण्यास मदत करतात. संतुलित सहरी, ज्यात जटिल कार्बोहायड्रेट, उच्च दर्जाचे प्रोटीन, हेल्दी फॅट आणि आवश्यक सूक्ष्म पोषक घटक असतात, उपवास अनुभव अधिक चांगला बनवू शकते. कॅलिफोर्निया बदाम, अंडी, ओट्स आणि केळीसारख्या पोषक अन्नपदार्थांसह इतर पौष्टिक अन्न निवडल्यास तुम्ही सतत ऊर्जा टिकवू शकता, दिवसभर सक्रिय राहू शकता आणि रमजानमध्ये चांगले पोषित राहू शकता.

## हाऊस ऑफ मॅकडॉवेल्स सोडा सादर करते 'यारी जल्लोष

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**



हाऊस ऑफ मॅकडॉवेल्स सोडा या ब्रँडने 'यारी जल्लोष : चाकांवरील होळी' या अनोख्या उपक्रमातून होळी सणाला एक नवे, साहसी आणि रोमांचकारी रूप दिले. या विशेष सोहळ्यात विनोदी कलाकार तनमय भट, आदित्य कुलश्रेष्ठ (कुल्लू), ऐश्वर्या मोहनराज आणि अनुज गुप्ता सहभागी झाले होते. उच्च कार्यक्षमतेच्या मोटारींना रंगांच्या सजीव कॅनव्हासमध्ये रूपांतरित करत मैत्रीचा जल्लो साजरा करण्यात आला. हाऊस ऑफ मॅकडॉवेल्स सोडा नेहमीच मैत्रीतील 'पहिल्या अनुभवांचा' आनंद साजरा करण्यावर भर देतो. दैनंदिन आयुष्यातील छोट्या टप्प्यांपासून ते आयुष्यातील खास क्षणांपर्यंत – मित्रांसोबत अनुभवलेले प्रत्येक 'पहिले' क्षण संस्मरणीय बनतात, असा ब्रँडचा विश्वास आहे. या होळीमध्ये ही संकल्पना नव्या पद्धतीने साकारण्यात आली. विस्तीर्ण मैदानावर आयोजित कार्यक्रमात दोन उच्च कार्यक्षमतेच्या मोटारी रंगांच्या खेळाचा केंद्रबिंदू ठरल्या. वेगाने फिरणाऱ्या चाकांमुळे रंगांचे स्फोट होत होते, पाठलागादरम्यान रंगांचे फवारे उडत होते आणि त्या क्षणांतील नैसर्गिक प्रतिक्रिया चित्रित केल्या जात होत्या. काँक्रीटचे मैदान हळूहळू रंगांनी नटलेल्या सजीव कॅनव्हासमध्ये परिवर्तित झाले. डायजिओ इंडिया या कंपनीच्या विपणन उपाध्यक्ष आनंदिता दत्ता म्हणाल्या, "हाऊस ऑफ मॅकडॉवेल्स सोडा साठी मैत्री ही केवळ भावना नसून तरुणांच्या जीवनशैलीला आकार देणारी सांस्कृतिक शक्ती आहे. 'मित्रांसोबत पहिले अनुभव' या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम पारंपरिक सणाला आधुनिक रूप देतो. आम्हाला केवळ सण साजरा करायचा नव्हता, तर तो एक सामूहिक आणि अविस्मरणीय अनुभव बनवायचा होता." या अनुभवाबद्दल बोलताना अभिनेता आणि विनोदी कलाकार आदित्य कुलश्रेष्ठ म्हणाले, "मी अनेकदा होळी खेळलो आहे; पण असा अनुभव कधीच नव्हता




# लेखन कौशल्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध - डॉ. शिरीष पिंगळे

### राजगुरू महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

**राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**



मराठी भाषा आणि साहित्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे कल्पकता आणि भाषेचा अचूक वापर करण्याचे कौशल्ये असेल तर पटकथा लेखन, जाहिरात लेखन, पत्रकारिता या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. स्मिता कोळेकर, डॉ. बाळासाहेब अनुसे, डॉ. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. डी. एम.मारकड, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. हेमलता चौधरी, प्रा. ओंकार टाकळकर उपस्थित होते.

कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी अभिवादन केले. ते पुढे म्हणाले की, मराठी भाषा गौरव दिन म्हणजे मराठी समाजाचा, संस्कृतीचा गौरव असून प्रत्येक मराठी जनाला मराठीपणाचा अभिमान वाटला पाहिजे. विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन, श्रवण, भाषण, संभाषण अशी भाषिक कौशल्य आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. संजय शिंदे यांनी कवी कुसुमाग्रजांच्या साहित्यिक योगदानाचा आढावा घेतला.आजचा दिवस आपल्या मायबोलीचा सन्मान करण्याचा आणि समृद्ध वाटचालीला उजाळा देण्याचा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. पार्थ खाडीलकर यांनी थॉमस कँडी यांचे मराठी भाषेला योगदान या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. थॉमस कँडी यांनी स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम, प्रश्नचिन्ह आणि उद्गारचिन्ह अशा पाच विरामचिन्हांच्या माध्यमातून मराठी भाषेला सौंदर्य प्राप्त करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

साक्षी शिवेकर या विद्यार्थिनीने संत साहित्य आणि मराठी भाषा या विषयावर मनोगत व्यक्त केले. प्राची बोत्रे, गायत्री देशमुख, ओंकार बोटकुळे, सारंग शिंदे या विद्यार्थ्यांनी अनुवादित पुस्तकांचा परिचय करून दिला. या वेळी प्रा. पार्थ खाडीलकर यांनी मराठी भाषा प्रतिज्ञेचे वाचन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे तर आभार प्रा. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.